( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग-६अ करिता )

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं/३-अ/पदो/ राखीव पोउपनि ते पोनि राखीव /९७/२०२२, मुंबई, दिनांक- २९ /०५/२०२४

वाचा :- १. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एसआरव्ही-२०१८/प्र.क्र.१५९/ कार्यासन १२, दि. ०१/०८/२०१९

२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीबीसी२०१८/प्र.क्र.३६६/१६-ब, दि. ०७/०५/२०२१

३. शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग दि. १४/०७/२०२१

४. या कार्यालयाचे शासनास उददेशून लिहिलेले समक्रमांकित, दि. १५/०४/२०२४ चे पत्र

५. महाराष्ट्र शासन, गृह विभाग पत्र क्र. संकीर्ण-०४२४/३५६/प्र.क्र. २७२/पोल-५ब, दि. ०७/०५/२०२४.

## -: आदेश :-

उपरोक्त संदर्भ क्र. २ मध्ये नमूद केलेल्या दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोटयातील सर्व रिक्त पदे दि. २५/०५/२००४ च्या स्थितीनुसार सेवाज्येष्ठतेने भरण्यात येत असून, दि. २५/०५/२००४ नंतर शासन सेवेत रुजु झालेल्या अधिका-यांना त्यांच्या मुळ सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत आहे. संदर्भ क्र. ०१ मधील शासन निर्णयानुसार विभागीय पदोन्नती समितीने राखीव पोलीस उप निरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी दि. २९/०८/२०२३ रोजी पात्रता तपासून सन २०२२-२३ ची निवडसूची तयार केली आहे.

२. संदर्भ क्र. ५ मध्ये नमूद शासन पत्र, दि. ०७/०५/२०२४ सोबत मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचेकडील इंग्रजी पत्र क्र. ४३७/MH-HP/२०२४ ( e Vigil)/ WS- II, दि. ०६/०५/२०२४ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन, सन २०२२-२३ च्या निवडसूचीवरील दि. ३१/०५/२०२४ रोजी सेवानिवृत्त होत असलेल्या पात्र राखीव पोलीस उप निरीक्षक यांना पदोन्नती देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

३. सन २०२२-२३ च्या निवडसूचीवरील सेवानिवृत्त होत असलेल्या पात्र ३ अधिका-यांना राखीव पोलीस निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यासाठी सामान्य प्रशासन विभाग, अधिसूचना दि.१४/०७/२०२१ मधील नियमांप्रमाणे महसूल विभाग वाटप करण्यात आलेले आहेत.

४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम-२२ न नुसार पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांना प्रदान असलेल्या अधिकारांचा वापर करुन खालील नमूद ३ राखीव पोलीस उपनिरीक्षकांना, त्यांनी कार्यभार ग्रहण केलेल्या दिनांकापासून **" राखीव पोलीस निरीक्षक "** या पदावर पदोन्नतीवर त्यांची पदस्थापना त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रकाना क्र. ५ मधील घटकांत करण्यास पोलीस आस्थापना मंडळ क्र.२ यांनी मान्यता दिली आहे. :-

| अ.क्र. | राखीव पोलीस उपनिरीक्षक यांचे नांव | सध्याची नेमणूक | वाटप झालेला महसुल विभाग | राखीव पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीवरील नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | प्रदिप रघुनाथ राणे | पालघर (पो.प्र.कें., मरोळ, मुंबई येथे बदली आदेशाधिन) | कोकण २ | मुंबई शहर |
| २ | दिलीप पांडुरंग मादेशवार | लोहमार्ग, नागपूर | नागपूर | भंडारा |
| ३ | मोतीलाल लक्ष्मण म्हस्के | पो.प्र.केंद्र, नानवीज दौंड | पुणे | पोलीस प्रशिक्षण केंद्र, सोलापूर |

Scanned with OKEN Scanner

५. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. १५ डिसेंबर २०१७ च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अवलोकन व्हावे. त्यानुसार उपरोक्त अधिका-यांना विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीनंतर जर त्यांच्याविरुध्दच्या प्रलंबित/ प्रस्तावित विभागीय / न्यायालयीन कार्यवाहीच्या अनुषंगाने

(१) शिक्षा प्रस्तावित/ चालू झाली असल्यास,

(२) विभागीय चौकशी चालू झाली असल्यास,

(३) गुन्हा दाखल / दोषारोप मा. न्यायालयात दाखल झाले असल्यास,

(४) निलंबित असल्यास इत्यादी प्रकरणात कार्यमुक्त न करता प्रकरणाचा सविस्तर अहवाल या कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशाची वाट पहावी.

६. सदरील आदेश मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतीम आदेशांच्या अधिन राहून व दिनांक ०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयाच्या अधिन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. जर संबंधित घटकामध्ये निवडणूक प्रक्रिया सुरु असल्यास किंवा त्या अनुषंगाने आचारसंहिता सुरु असल्यास घटक प्रमुखांनी त्याबाबत संबंधित निवडणूक अधिकाऱ्यांशी संपर्क साधून, आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची काळजीपूर्वक दक्षता घ्यावी.

८. सदर पदोन्नती आदेशामधील राखीव पोलीस उप निरीक्षक हे जर आदेशांमध्ये नमूद केलेल्या घटकांमध्ये सध्या कार्यरत नसतील तर, ते ज्या घटकांत कार्यरत आहेत, त्या घटक प्रमुखांनी त्यांना पदोन्नतीच्या घटकांत हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे, व तसे हया कार्यालयास न चुकता कळवावे.

**९. पदोन्नती झालेल्या सर्व राखीव पोलीस निरीक्षक यांचे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी अभिनंदन केले आहे.**

**रश्मि शुक्ला**
पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह )
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह)
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई
परीक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर / कोंकण परिक्षेत्र, नवी मुंबई
पोलीस उप महानिरीक्षक, गडचिरोली परीक्षेत्र, कॅम्प नागपूर
पोलीस अधीक्षक, पालघर / लोहमार्ग, नागपूर / भंडारा
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र, मरोळ, मुंबई / नानवीज दौंड, पुणे / सोलापूर

**प्रत सविनय सादर,**

मा. मुख्य निवडणूक अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ३२
अपर मुख्य सचिव (गृह), महाराष्ट्र शासन, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१ / महाराष्ट्र राज्य, नागपूर -२

प्रत,

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पो.म.सं. कार्यालय, मुंबई

२. यांनी सदरचे आदेश राखीव पोलीस उपनिरीक्षक यांना राखीव पोलीस निरीक्षक ( RSI to RPI Promotion) या पदावर पदोन्नती या विषयाखाली पोलीस महासंचालक कार्यालयाच्या www.mahapolice.gov. in या संकेतस्थळावर १ महिन्यासाठी उपलब्ध करुन द्यावेत.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २/ ९/ ११/ ११-अ/ ३६/ ४०.

**( संजीव कुमार सिंघल )**
अपर पोलीस महासंचालक (आस्थापना),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचेकरिता.

Scanned with OKEN Scanner